# शिवरात्रि
## स्तुति



कैला सरा णा शि वचंद्रमौ ळी ।
फणीं द्र मा थां मुकुटी झळा ळी ।
का रुण्यसिं धू भवदुः खहा री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ १ ॥
रवीं दु दा वा नल पूर्ण भा ळी ।
स्वतेज नेत्रीं ति मि रौ घ जा ळी ।
ब्रह्मां डधी शा मदनां तका री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ २ ॥
जटा वि भूति उटि चंदना ची ।
कपा लमा ला प्रि त गौ तमी ची ।
पंचा नना वि श्वनि वां तका री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ३ ॥
वैरा ग्ययो गी शि व शूलपा णी ।
सदा समा धी नि जबो धवा णी ।
उमा नि वा सा त्रि पुरां तका री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ४ ॥
उदा र मेरु पति शैलजेचा ।
श्री वि श्वना थ म्हणती सुरां चा ।
दया नि धी चा गजचर्मधा री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ५ ॥
ब्रह्मा दि वंदी अमरा दि ना थ ।
भुजंगमा ला धरि सो मकां त ।
गंगा शि रीं दो ष महा वि दा री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ६ ॥
कर्पूरगौ री गि रि जा वि रा जे ।
हळा हळें कंठ नि ळा चि सा जे ।
दा रि द्र्यदु दुः खे स्मरणें नि वा री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ७
स्मशा नक्री डा करि तां सुखा वे ।
तो देव चूडा मणि को ण आहे ।
उदा समूर्ती जटा भस्मधा री ।
तुजवी ण शंभो मज को ण ता री ॥ ८ ॥

# शिवरात्रि
## स्तुति



भूतादिनाथ अरि अंतकाचा ।
तो स्वामि माझा ध्वज शांभवाचा ।
राजा महेश बहुबाहुधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥९॥
नंदी हराचा हर नंदिकेश ।
श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।
सदाशिव व्यापक तापहारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१०॥
भयानक भीम विक्राळ नग्न ।
लीलाविनोदें करि काम भग्न ।
तो रुद्र विश्वंभर दक्ष मारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥११॥
इच्छा हराची जग हे विशाळ ।
पाळी रची तो हरि ब्रह्मगोळ ।
उमापती भैरव विघ्नहारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१२॥
भागीरथीतीर सदा पवित्र ।
जेथें असे तारक ब्रह्ममंत्र ।
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१३॥
प्रयाग वेणी सकळा हराच्या ।
पदारविंदी वहाती हरीच्या ।
मंदाकिनी मंगल मोक्षकारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१४॥
कीर्ती हराची स्तुती बोलवेना ।
कैवल्यदाता मनुजा कळेना ।
एकाग्रनाथ विष अंगिकारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१५॥
सर्वांतरी व्यापक जो नियंता ।
तो प्राणलिंगाजवळी महंता ।
अंकी उमा ते गिरिरूपधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१६॥

# शिवरात्रि
## स्तुति



सदा तपस्वी असे कामधेनु ।
सदा सतेज शतकोटी भानू ।
गौरीपती जो सदा भस्मधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१७॥
कर्पूरगौर स्मरल्या विसावा ।
चिंता हरी जो भजकां सदैवा ।
अंती स्वहितसुचना विचारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१८॥
विरामकाळी विकळे शरीर ।
उदास चित्तीं न धरीच धीर ।
चिंतामणी चिंतनि चित्तहारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥१९॥
सुखावसानीं सकळें सुखाची ।
दुःखावसानी टळती जगाचीं ।
देहावसानी धरणी थरारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२०॥
अनुहतशब्द गगनी न माय ।
तिचेनि नादें भव शून्य होय ।
कथा निजांगे करुणा कुमारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२१॥
शांतिस्वलीला वदनीं विलासे ।
ब्रह्मांडगोळीं असुनी न दिसे ।
भिल्ली भवानी शिवब्रह्मचारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२२॥
पीतांबरें मंडित नाभि ज्याची ।
शोभा जडीत वरि किंकिणींची ।
श्रीवेददत्त दुरितान्तकारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२३॥
जिवाशिवांची जडली समाधी ।
विटला प्रपंचीं तुटली उपाधी ।
शुद्धस्वरे गर्जती वेद चारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२४॥

# शिवरात्रि
## स्तुति

निदान कुंभ भरला अभंग ।
पहा निजांगे शिव ज्योतिर्लिंग ।
गंभीर धीर सुरचक्रधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२५॥
मंदार बिल्वें बकुलें सुवासी ।
माला पवित्र वहा शंकरासी ।
काशीपुरी भैरव विश्व तारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२६॥
जाई जुई चंपक पुष्पजाती ।
शोभे गळा मालतिमाळ हातीं ।
प्रतापसूर्य शरचापधारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२७॥
अलक्ष्यमुद्रा श्रवणी प्रकाशे ।
संपूर्ण शोभा वदनीं विकासे ।
नेई सुपंथे भवपैलतारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२८॥
नागेशनामा सकळां जिव्हाळा ।
मना जप रे शिवयंत्रमाळा ।
पंचाक्षरी ध्यानगुहा विहारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥२९॥
एकान्ति ये रे गुरुराजस्वामी ।
चैतन्यरुपी शिव सूखनामी ।
शिणलों दयाळा बहुसाळ भारी ।
तुजवीण शंभो मज कोण तारी ॥३०॥
शास्त्राभ्यास नको व्रतें मख नका तीव्रें तपें ती नको ।
काळाचें भय मानसीं धरु नको दुष्टांस शंकू नका ।
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥३१॥